# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),नागपूर यांचे कार्यालय.

शासकिया मुद्रणालयाजवळ,झिरो माईल,सिव्हील लाईन,नागपूर.४४० ००१
Ph.No.0712-2564569, FNo.0712-2563393,
E-mail:-ccftnagpur@yahoo.com, dfovigilance@ gmail. com.


स्थाई आदेश क्रमांक: ०१ नागपूर, दिनांक २६/०४/२०१७

विषय:- **नियत क्षेत्र तपासणी करतांना अवलंबावयाच्या कार्य पध्दतीबाबत.**

शासन निर्णय क्रमांक टिआरएस-०४/२०१४/प्र.क्र.७२/फ-६, मुंबई दिनांक १३ ऑगष्ट, २०१४ अन्वये वनसंरक्षणाचे मापदंड निर्धारीत करण्यात आले आहे. त्यात इतर बाबी व्यतिरिक्त नियतक्षेत्र तपासणी संदर्भात सुचना देण्यात आलेल्या आहे. नियतक्षेत्र तपासणी करतांना वृत्तस्तरावर एकसुत्रता रहावी व नियतक्षेत्र तपासणीमुळे वनसंरक्षणाचे कामात सुधारणा व्हावी या दृष्टीने माहे एप्रिल,२०१७ पासून तपाणीबाबत अवलंबवयाच्या कार्यपध्दतीबाबत पुढिल निर्देश देण्यात येत आहे.

१. कॅलेन्डर वर्षात नियतक्षेत्र तपासणी कार्यक्रम निर्धारीत करतांना संबंधित वनपालाने ज्या महिन्यात तपासणी केली आहे त्या पुढिल महिन्यात प्रादेशिक वनक्षेत्रापाल हे तपासणीसाठी जातील या दृष्टिने कार्यक्रम आखावा. त्याचप्रमाणे प्रादेशिक वनक्षेत्रपाल यांनी तपासणी झाल्यानंतर पुढिल महिनयात संबंधित सहाय्यक वनसंरक्षक प्रादेशिक किंवा फिरते पथक यांचेकडून तपासणी होईल, याची दक्षता घ्यावी. अश्या प्रकारे कनिष्ठांनी केलेल्या काही उणीवा लक्षात आल्यास त्याबाबत सुधारणा वरिष्ठांकडून होणे अभिप्रेत राहील.

२. नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी तपासणीचे तारखेबद्दल संबंधित बिट वनरक्षक आणि संबंधित वनपाल यांस पुर्व कल्पना द्यावी.

३. बिट तपासणीचे प्रथम दिवशी नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी बिट वनरक्षकाकडून प्राथमिक वनगुन्हा नोंदवही ताब्यात घेवून शेवटी नोंदविण्यात आलेल्या वनगुन्हे रिपोर्टवर स्वाक्षरी करावी.

४. तपासणी सुरू करण्यापुर्वी तपासणी अधिकारी यांनी संबंधित बिट वनरक्षकाकडे असलेल्या जप्ती हॅमर तपासणी होईपर्यंत स्वतःच्या ताब्यात ठेवावा.

५. नियतक्षेत्र तपासणी अधिकारी यांनी संबंधित बिट वनरक्षकाचा हॅमर न वापरता स्वतःचा हॅमर वापरावा.

६. नियतक्षेत्रातील सर्व वनखंड तपासले जातील अश्या प्रकारे नियोजन करावे.

७. तपासणी करतांना तपासणी अधिकारी यांनी अवैध वृक्षतोडी बरोबरच अवैध चराई, अतिक्रमण, वनवणवा, अवैध खोदकाम, सिमा बुरूज तपासणी, वन्यप्राण्यांचे अधिवासास इजा इत्यादी बाबतची नोंद घ्यावी. अश्या आढळुन आलेल्या बाबींबाबत पुर्वी नोंदविण्यात आलेले नसल्यास त्याबाबतचे वनगुन्हे नोंदवावेत. तपासावयाच्य सर्व सामान्य बाबी खालील प्रमाणे राहतील.

१) अवैध वृक्षतोड

२) अवैध गवत चराई

३) अवैध बांबु कटाई

४) बिटांची सिमा - दगडी बुरूज, सिमेंटचे पील्ल्र, (व्यावस्थित /तुटलेले), गरे प्रतिबंधक चर, असल्यास त्याची स्थिती (बुजलेले/ बुजविलेले)

५) अतिक्रमण - नविन/जुने अंदाजित क्षेत्र.

६) अंगार स्थिती - जळालेले क्षेत्र, अंदाजित कालावधी, जारी वनगुन्हा क्रमांक व दिनांक

७) वन्यप्राणी अस्तित्व - प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष, खुणा/पाऊलखुणा

८) बिट मधील रोपवने - क्षेत्र, रोपवन वर्ष, प्रजाती व सद्यस्थिती.

९) पाणवठे अस्तित्व - सिमेंट बांध, मातीचे बांध, वनतळे, असल्यास नग व बांधांची स्थिती चांगले/ फुटलेले, पाणी असलेले/कोरडे.

१०) बिट क्षेत्रात आढळणा-या प्रजाती, मौल्यवान फळ

८. बिट वनरक्षकाने पुर्वी जप्त केलेल्या मालची नोंदवही तपासावी म्हणजे त्याअनुषंगाने वनरक्षकाच्या ताब्यात असलेल्या मालात तफावत आढळुन येत असले तर त्याची नोंद करावी. तसेच शासकीय आगारात वाहतुक न झालेल्या मालाबाबत तपासणी अधिकारी यांनी सबंधित वनरक्षक, वनपाल व वनक्षेत्रपाल यांना सुचना द्यावी.

९. वनरक्षकाकडे दप्तर, हॅमर, थुट नोंदवही, प्रथम वनगुन्हा अहवाल नोंदवही, आदेश पुस्तिका अद्यावत, नियतक्षेत्र नकाशा, गाव नकाशा, टोपोशिट इत्यादीसाहित्य राहील, याची व्यवस्था उपवनसंरक्षक यांनी करावे.

१०. वनक्षेत्रपाल व सहाय्यक वनसंरक्षक यांनी नियतक्षेत्र तपासणीचे वेळी वनहक्क कायद्यातील (वैयक्तिक व सामुहीक) बाबींचा आढावा घेवून नामंजूर वनहक्क क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात घेण्यात आले किंवा नाही, याची खात्री करावी व तशी नोंद ठेवावी.

११. या आदेशाची प्रत सर्व वनरक्षक व वनपाल यांचे दप्तरासोबत कायमस्वरूपी राहावी याची दक्षता घ्यावी.

(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
नागपूर

क्रमांक.कक्ष-५/दक्षता/वसमादआ/ २९८ /१७-१८
नागपूर, दिनांक २६ एप्रिल, २०१७.

प्रति
उपवनसंरक्षक,(सर्व)

"उक्त आदेशातील सुचनाबाबत नियंत्राणाखालील सहाय्यक वनसंरक्षक, वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक (सर्व) यांना अवगत करावे व त्यांनी त्यांचे स्तरावरून कार्यवाही सुचना निर्गमित कराव्यात."

प्रतिलीपीः-प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा.नागपूर यांना माहितीस सविनय सादर

प्रतिलीपीः- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांनामाहितीस सविनय सादर

प्रतिलीपीः-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) म.रा.नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

प्रतिलीपीः-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) म.रा.नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

प्रतिलीपीः-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व,नागपूर यांना माहितीस सनिवय सादर.

प्रतिलीपीः-मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.

प्रतिलीपीः-वनसंरक्षक तथा क्षेत्रा संचालक,नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र,गोंदिया यांना माहितीस अग्रेषित.

प्रतिलीपीः- आदेश प्रत.